**वन विभागांतर्गत कार्यरत असलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांचा वन वणवा, वन्यप्राणी हल्ला, वन तस्कर/ शिकारी यांच्या हल्ल्यात तसेच वन्य प्राण्यांचा बचाव करतांना मृत्यू झाल्यास व कायमचे अपंगत्व आल्यास त्यांचे वारसास लाभ देण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

**महसूल व वन विभाग**

**शासन निर्णय क्र. एफएसटी-११/२१/प्र. क्र.२४८/ फ-४**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक: १२ ऑक्टोंबर, २०२२.

**संदर्भ:** १) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.टिआरएस-१०९८/प्रक्र.१९०/फ-६, दि.२२.९.२००८

२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन व दुय्यम संवर्ग), नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष- १०(२)/ आस्था/एक/प्रक्र.४६ (१७-१८)/१०८, दि.९.९.२०२०

**प्रस्तावना:**

राज्यात दि.२२.९.२००८ च्या शासन निर्णयान्वये वन धोरण करण्यात आलेले आहे. सदर वन धोरणात नैसर्गिक व मानव निर्मित वनांचे संरक्षण आणि व्यवस्थापन या अंतर्गत वनसंरक्षणाचे कर्तव्य पार पाडतांना कोणत्याही वन अधिकारी /कर्मचारी यांचा मृत्यू झाल्यास अथवा अपंग झाल्यास अशा बाधीत वन अधिकारी/ कर्मचारी यांना किंवा त्यांच्या नातेवाईकांना पोलीस खात्यात चालू असलेल्या पध्दतीप्रमाणे नुकसान भरपाई व आर्थिक मदत दिली जाईल असे ठरविण्यात आले आहे.

मानवाला तसेच पशु पक्षांना अनेक प्रकारे उपयोगी ठरणाऱ्या वनाचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. वनसंरक्षणाचे कर्तव्य पार पाडत असतांना वन अधिकारी/कर्मचारी यांचे काही वेळा प्राण जातात अथवा गंभीररित्या जखमी होतात. या सर्व बाबी विचारात घेता, वन विभागांतर्गत कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचा वन वणवा, वन्यप्राणी हल्ला, वन तस्कर/ शिकारी यांच्या हल्ल्यात तसेच वन्य प्राण्यांचा बचाव करतांना मृत्यू झाल्यास व कायमचे अपंग झाल्यास अशा कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना वा बाधित वन अधिकारी/कर्मचारी यांना महाराष्ट्र राज्यातील पोलीस विभागाच्या तसेच इतर राज्यात देण्यात येणाऱ्या नुकसान भरपाईच्या धर्तीवर नुकसान भरपाई तसेच इतर सोयी सुविधा देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

वन वणवा, वन्यप्राणी हल्ला, वन तस्कर/ शिकारी यांच्या हल्ल्यात तसेच वन्य प्राण्यांचा बचाव करताना मृत्यू पावलेल्या / कायमचे अपंगत्व आलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वारसांना खालीलप्रमाणे नुकसान भरपाई तसेच इतर सोयी सुविधा मंजूर करण्यात येत आहेत.

(१) नुकसान भरपाई :-

| अ. क्र. | पदनाम / श्रेणी | मृत्यू पावल्यास | कायमचे अपंगत्व आल्यास |
|---|---|---|---|
| १ | गट-अ व त्यावरील अधिकारी | रु.२५,००,०००/- | रु.३,६०,०००/- |
| २ | गट- ब अधिकारी | रु.२५,००,०००/- | रु.३,३०,०००/- |
| ३ | गट- क कर्मचारी | रु.२५,००,०००/- | रु.३,००,०००/- |
| ४ | गट- ड कर्मचारी | रु.२५,००,०००/- | रु.३,००,०००/- |

वरीलप्रमाणे रु.२५ लक्ष नुकसान भरपाई ही कायदेशीर वारसदारांच्या संयुक्त नावाने मुदत ठेव म्हणून देण्यात येईल. सदर रक्कम १० वर्षांपर्यंत काढता येणार नाही. व्याज रक्कम दर महिन्याला घेता येईल. मुदत ठेवीची रक्कम फक्त अपवादात्मक परिस्थितीत व तसे नियुक्ती प्राधिकाऱ्याने प्रमाणित केल्यास ५ वर्षानंतर काढून घेता येईल.

(२) वन वणवा, वन्यप्राणी हल्ला, वन तस्कर / शिकारी यांच्या हल्ल्यात तसेच वन्य प्राण्यांचा बचाव करतांना मृत्यू पावलेल्या वन अधिकारी /कर्मचाऱ्याच्या कुटुंबात अनुकंपा नियुक्तीस पात्र उमेदवार नसल्यास अगर वारसाने अनुकंपा नियुक्ती स्विकारण्यास नकार दिल्यास, मृत अधिकारी /कर्मचारी जणू काही मृत झाली नाही असे मानून सदर अधिकारी /कर्मचारी सेवेत असते तर मृत्यूच्यावेळी जे पद धारण करीत होते त्या पदावरुन वरच्या पदावर पदोन्नतीसाठी ज्या ज्या वेळी पात्र ठरली असती त्या-त्या वेळी सदर व्यक्ती पदोन्नत झाली असे गृहीत धरुन त्या अधिकारी/कर्मचाऱ्याची वेतन निश्चिती करण्यात यावी. त्यानुसार पदोन्नतीच्या पदावर निश्चित करण्यात आलेले वेतन मृत वन अधिकारी /कर्मचाऱ्याच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत देण्यात यावे. सदर वेतन वार्षिक वेतनवाढीसह देण्यात यावे.

(३) मृत्यूमुखी पडलेल्या वन अधिकारी / कर्मचारी यांचे पार्थिव देह रेल्वे, बस व ॲम्बुलन्स इत्यादी प्रकारच्या वाहनाद्वारे नेण्याचा सर्व खर्च व पार्थिव देहाबरोबर एका व्यक्तिला जाण्यासाठी येणारा खर्च शासनातर्फे करण्यात यावा.

(४) जखमी वन अधिकारी / कर्मचारी यांचा राज्यांतर्गत औषधोपचारांचा व शस्त्रक्रियेचा रुग्णालयातील सर्व खर्च राज्य शासनातर्फे देण्यात यावा.

हा शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२२१०१२११२८१००३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( डॉ. रविकिरण गोवेकर )**
**मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय ,मुंबई,
५. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद/ विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
७. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
८. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,

९. सर्व मंत्रालयीन विभागाचे अमुस/प्र.स./सचिव,
१०. सचिव, मा. सभापती, विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई,
११. सचिव, मा. अध्यक्ष, विधानसभा, विधानमंडळ, मुंबई,
१२. महालेखापाल -१ व २ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुबंई/नागपूर
१३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१५. प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (सर्व)
१७. मुख्य वनसंरक्षक (सर्व)/वनसंरक्षक (सर्व) / उप वनसंरक्षक (सर्व) / विभागीय वन अधिकारी (सर्व)
१८. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व ),
१९. निवडनस्ती, फ-४ कार्यासन महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.